12 APR 2022 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महात्मा फुले यांना अभिवादन


कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात महात्मा फुले यांना अभिवादन करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

क्रांतिज्योती महात्मा फुले यांना जयंतीनिमित्त विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्ष, शाळा, महाविद्यालयांमध्ये अभिवादन करून बिंदू चौकातील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

**शिवाजी विद्यापीठ**

शिवाजी विद्यापीठात महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ.व्ही. एन. शिंदे यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

यावेळी प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, आयक्यूएसी संचालक डॉ. एम. एस. देशमुख, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये आदी उपस्थित होते.

12 APR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात अभिवादन, स्मृतींना उजाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन केले. मान्यवरांनी त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला. मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते महात्मा जोतिराव फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात महात्मा जोतिराव फुलेंना अभिवादन प्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह मान्यवर.**

प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनीही प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, आयक्यूएसी संचालक डॉ. एम. एस. देशमुख, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये, इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील, इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी, उपकुलसचिव डॉ. पी. एस. पांडव यांच्यासह प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

12 APR 2022 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवसंशोधनच नैसर्गिक आपत्तीला तोंड देईल

## ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. जी. डी. यादव : 'नवशोधन:मंत्र आणि तंत्र'चे प्रकाशन



कोल्हापूर : "नवशोधन: मंत्र आणि तंत्र" या पुस्तकाचे प्रकाशन करताना ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. जी. डी. यादव. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, अरविंद देशपांडे, डॉ. देशमुख, प्रा. भालबा केळकर व डॉ. सुहास खांबे.

प्रतिनिधी
कोल्हापूर

सध्या मानवजातीपुढे इंधन दरवाढीसह ग्लोबल वॉर्मिगसारखी अनेक नैसर्गिक व मानवनिर्मित आव्हाने उभी आहेत. त्यावर उपाययोजना करण्यासाठी नवसंशोधन व नवोपक्रमास चालना देण्याखेरीज पर्याय नाही, असे प्रतिपादन ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. जी. डी. यादव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड लिंकेजिस, एसयुके संशोधन व विकास फौंडेशन (सेक्शन-८ कंपनी) आणि सांगली येथील सिस्टेड फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्टार्ट-अप सूत्रा" या मालिकेअंतर्गत आयोजित 'नवोपक्रमातून राष्ट्रबांधणी" या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते. मान्यवरांच्या हस्ते सिस्टेड फाऊंडेशनचे प्रा. भालबा केळकर व डॉ. सुहास खांबे यांनी लिहीलेल्या 'नवशोधन: मंत्र आणि तंत्र" या पुस्तकाचे प्रकाशन केले.

डॉ. यादव म्हणाले, प्रत्येक तरुणाने आता स्वत:चे ध्येय-धोरण ठरविण्याची हीच योग्य वेळ आहे. भविष्यात पदवी मिळाल्यानंतर नोकरी मागण्याऐवजी नोकऱ्यांची निर्मिती करण्याचे ध्येय प्रत्येक विद्यार्थ्याने बाळगले पाहिजे. त्याचप्रमाणे नवसंशोधन व नवोपक्रमास चालना देत राहायला हवे. शिवाजी विद्यापीठाने या अनुषंगाने एक पाऊल पुढे टाकून स्वत:ची सेक्शन-८ कंपनी सुरू करून विद्यार्थ्यांच्या उद्यमशीलतेला बळकटी दिली आहे. त्याचा फायदा विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे. आपण केलेल्या गोष्टींना कमी लेखू नये, कारण त्यातूनच नवकल्पना आणि उद्योग सुरू होऊ शकतात. संशोधनाचे पेटंट घेणे आणि त्यांचे प्रकाशन करणे, त्यापुढे जाऊन स्वत:चा उद्योग सुरू करण्याचे ध्येय विद्यार्थ्यांनी बाळगले पाहिजे. मुलींसाठी पीएच. डी.पर्यंतचे शिक्षण मोफत केले तर संशोधनात मुलींचा टक्का वाढेल. असेही डॉ. यादव यांनी सांगितले.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांनी समाजाच्या प्रश्नांचा शोध घेत, त्यावर संशोधन नवनवीन उद्योग करावेत. आपल्या मनात संकल्पनेचे तंत्रज्ञानामध्ये किंवा एखाद्या उत्पादनामध्ये रुपांतर करण्यासाठी विद्यापीठ तयार आहे. केंद्राचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सेक्शन-८ कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी. डी. राऊत यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. अभियंते हर्षवर्धन पंडित यांनी प्रकाशित पुस्तकाविषयी माहिती दिली. उद्योजक अरविंद देशपांडे यांनी आभार मानले.

लोकमत

# ‘महात्मा फुले यांचे साहित्य मानवमुक्तीचा ध्यास घेणारे’

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महात्मा जोतिबा फुले यांनी मानवी प्रतिष्ठेसाठी संघर्ष आणि लेखन केले. स्त्री-पुरुष समानतेचा विचार मांडणारे ‘तृतीयरत्न’ मराठीतील पहिले सामाजिक विचारनाट्य होते. मानसिक गुलामगिरीतून माणूस मुक्त झाला पाहिजे, असा त्यांचा विचार होता. मानवमुक्तीचा ध्यास घेणारे त्यांचे साहित्य होते, असे प्रतिपादन डॉ. छाया पोवार यांनी सोमवारी येथे केले.

विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे फुले-शाहू-आंबेडकर सप्ताह अंतर्गत आयोजित ‘महात्मा जोतिबा फुले यांचे मानवतावादी साहित्य’ या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी केंद्रसंचालक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. प्रा. महाजन म्हणाले, महात्मा फुले यांनी स्त्री-पुरुष समानता, स्वातंत्र्य, शिक्षणाची गरज, शेतकऱ्यांचे प्रश्न या अनुषंगाने जातिभेद नष्ट व्हावा. मानवी समाज अंधश्रद्धांमधून व कर्मकांडाच्या जाचातून मुक्त व्हावा म्हणून त्यांनी साहित्याची निर्मिती केली. डॉ. दीपा श्रावस्ती यांनी स्वागत केले. प्रा. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. अमोल मिणचेकर यांनी आभार मानले.

लोकमत

# विद्यापीठात महात्मा फुले यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात महात्मा ज्योतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना सोमवारी सकाळी अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

12 APR 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऐरणीवरील प्रश्नांचा अभ्यास करण्याची गरज

## श्रुती तांबे : राष्ट्रीय चर्चासत्रात रमेश जाधव जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित

लोकमत न्यूज नेटवर्क

रत्नागिरी : समाजशास्त्राच्या अभ्यासाची सुरुवात महाराष्ट्रात होऊन शतक उलटले असून, त्याचे जैविक मूल्यांकन होणे आवश्यक आहे. ज्या भूमीत समाजशास्त्र रुजले, त्याचे धागेदोरे जगातल्या इतर खंडातील अन्य भागात पसरले त्याचे शतकोत्तर कार्यक्रमाचा एक भाग म्हणून दस्तऐवजीकरण करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या समाजशास्त्रज्ञ डॉ. श्रुती तांबे यांनी केले.



रत्नागिरीत आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात कोल्हापूर येथील ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ आणि समाजशास्त्राचे अभ्यासक प्रा. डॉ. रमेश जाधव यांना 'जीवन गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा. डॉ. पी. एस. पाटील, डॉ. परमजीतसिंग जज उपस्थित होते.

रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीचे गोगटे - जोगळेकर महाविद्यालय आणि मराठी समाजशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'भारतीय समाज आणि विकास प्रक्रिया' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन सोमवारी करण्यात आले. त्यावेळी डॉ. तांबे बोलत होत्या.

मराठी समाजशास्त्र परिषदेतर्फे समाजशास्त्राच्या क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या कोल्हापुरातील ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ प्रा. डॉ. रमेश जाधव (कोल्हापूर), डॉ. बी. एल जोशी, प्रा. डॉ. एस. एल. गायकवाड (औरंगाबाद), प्रा. डॉ. प्रदीप आगलावे (नागपूर), प्रा. डॉ. रमेश कांबळे (मुंबई) यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. संस्था आणि महाविद्यालयातर्फे प्रा. एस. एन. पवार यांना कृतज्ञता सन्मान प्रदान करण्यात आला. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी सामाजिक शास्त्राच्या अभ्यासकांनी कोरोनामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांचा समाजावरील परिणामाचा अभ्यास करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. भारतीय समाजशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष बीजभाषक डॉ. परमजीतसिंग जज यांनी समाजशास्त्रातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान, समाजशास्त्रातील बदलते प्रवाह, समकाळातील बदलत्या प्रवाहाबाबत मार्गदर्शन केले.

पुढारी

# विद्यापीठात उद्या डॉ. संगवे स्मृती व्याख्यान

कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) : समाजशास्त्र अधिविभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय कीर्तीचे समाजशास्त्रज्ञ प्रा. डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यानाचे बुधवार (दि. १३) रोजी मानव्यशास्त्र सभागृहामध्ये सकाळी ११ वाजता आयोजन केले आहे. भारतीय समाजशास्त्र संस्थेचे माजी अध्यक्ष व गुरुनानक देव विद्यापीठ, अमृतसर, पंजाब येथील माजी अधिष्ठाता (सामाजिकशास्त्रे) प्रा. डॉ. परमजीत सिंग जज्ज यांचे 'प्रबोधन, तर्कसंगतता व समाजशास्त्राचा उदय : पुराणमतवादी प्रतिक्रिया समजून घेणे' विषयावर व्याख्यान होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील.

पुढारी

# मानवमुक्तीचा ध्यास घेणारे महात्मा फुले यांचे साहित्य

## डॉ. छाया पोवार : शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महात्मा जोतिराव फुले यांनी मानवी प्रतिष्ठेसाठी संघर्ष व लेखन केले. गुलामगिरी ग्रंथातून त्यांनी भारतातील दोन परंपरांच्या सांस्कृतिक संघर्षाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मानव मुक्तीचा ध्यास घेणारे महात्मा फुले यांचे साहित्य होते, असे प्रतिपादन डॉ. छाया पोवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे फुले, शाहू, आंबेडकर सप्ताह अंतर्गत महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'महात्मा जोतिराव फुले यांचे मानवतावादी साहित्य' विषयावरील व्याख्यानप्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. डॉ. पोवार म्हणाल्या, अंधश्रद्धा, अवतार कल्पना व खोट्या समजुती यावर महात्मा फुले यांनी हल्ला चढवला. अंतकरणाचे बोल प्रकट करणारी व मानवमुक्तीचा ध्यास घेणारी काव्यरचना महात्मा फुले यांनी केली. सुखी व समृद्ध मानवजातीचे स्वप्न त्यांनी पाहिले. धर्माकडेसुद्धा डोळसपणे पाहिले पाहिजे.

अध्यक्षीय भाषणात प्रा. महाजन म्हणाले, महात्मा जोतिराव फुले यांनी स्त्री-पुरुष समानता, स्वातंत्र्य, शिक्षणाची गरज, शेतकऱ्यांचे प्रश्न या अनुषंगाने जातीभेद नष्ट व्हावा व मानवी समाज अंधश्रद्धेमधून आणि कर्मकांडाच्या जाचातून मुक्त व्हावा, म्हणून महात्मा फुले यांनी साहित्याची निर्मिती केली. डॉ. दीपा श्रावस्ती यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अमोल मिणचेकर यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानप्रसंगी बोलताना डॉ. छाया पोवार, प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन, प्रा. अविनाश भाले आदी.** (फोटो : पप्पू अत्तार)

# पुण्यनगरी



रत्नागिरी येथे गोगटे–जोगळेकर महाविद्यालयात मराठी समाजशास्त्र परिषदेकडून राष्ट्रीय स्तरावरील 'जीवनगौरव' पुरस्कार प्रदान सोहळा झाला. यामध्ये ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ आणि समाजशास्त्राचे अभ्यासक प्रा. डॉ. रमेश जाधव यांना गौरवताना डॉ. एन्. एस. पवार. सोबत डॉ. नारायण कांबळे, स्मिता जाधव, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आदी.

12 APR 2022 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समाजशास्त्राच्या शिक्षकांनी सर्व विषयांचा अंतर्भाव करावा

## प्रा. डॉ. रमेश जाधव : रत्नागिरीत जीवनगौरव पुरस्काराने सन्मान

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ११ : प्रत्येक ऐतिहासिक घटनेच्या मागेही काही तरी भूगोल असतो, तसाच समाजशास्त्राच्या शिक्षकांनी हा विषय केवळ समाजशास्त्र म्हणून नव्हे, तर सर्व विषयांचा अध्यापनात अंतर्भाव करून तो शिकवला पाहिजे, असे स्पष्ट मत ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रा. डॉ. रमेश जाधव यांनी व्यक्त केले.

मराठी समाजशास्त्र परिषदेकडून दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील ''जीवनगौरव'' पुरस्काराने आज त्यांचा रत्नागिरी येथे सन्मान झाला. त्यावेळी ते बोलत होते.



कोल्हापूर : मराठी समाजशास्त्र परिषदेतर्फे सोमवारी प्रा. डॉ. रमेश जाधव यांचा जीवनगौरव पुरस्काराने गौरव झाला. यावेळी डॉ. नारायण कांबळे, डॉ. एस. एन. पवार, स्मिता जाधव, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आदी.

प्रा. डॉ. जाधव यांनी पत्नी स्मिता जाधव यांच्यासह हा सन्मान स्वीकारला. डॉ. एस. एन. पवार, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत गोगटे-जोगळेकर महाविद्यालयात पुरस्कार वितरण झाले. परिषदेचे अध्यक्ष डॉ. नारायण कांबळे, सचिव डॉ. वेदप्रकाश मलवाडे आदी उपस्थित होते.

प्रा. डॉ. जाधव यांनी संवादात जगभरातील विविध विचारवंतांचे दाखले देत संवाद साधला. ते पुढे म्हणाले, ''येत्या काळात महापुरुषांतील मतभेदांवर अधिक लिहिणे आणि बोलण्यापेक्षा त्यांच्यातील सौहार्द आणि एकूणच सकस समाजनिर्मितीसाठी आवश्यक गोष्टींवर भर दिला पाहिजे. शिक्षकांनी सर्वज्ञ असल्याचे न मानता विद्यार्थ्यांना विषय अधिक प्रभावीपणे समजण्यासाठी अध्यापन शैलीतही बदल करणे आवश्यक आहे.''

दरम्यान, परिषदेच्या वतीने अध्ययन, अध्यापन, संशोधन व ग्रंथनिर्मिती क्षेत्रातील अतुलनीय व महत्त्वपूर्ण कामगिरीसाठी परिषदेकडून राष्ट्रीय स्तरावर प्रतिष्ठेचा मानला जाणारा जीवनगौरव पुरस्कार दिला जातो. प्रा. डॉ. जाधव यांच्या एकूणच कार्याची दखल घेवून त्यांचा यंदा गौरव केल्याचे परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

सकाळ



कोल्हापूर : फुले, शाहू, आंबेडकर सप्ताहांतर्गत व्याख्यानात बोलताना डॉ. छाया पोवार.

# मानवमुक्तीचा ध्यास घेणारे फुलेंचे साहित्य : डॉ. पोवार

कोल्हापूर, ता. ११ : ''महात्मा फुले यांनी मानवी प्रतिष्ठेसाठी संघर्ष, लेखन केले. स्त्री-पुरुष समानतेचा विचार मांडणारे 'तृतीय रत्न' हे मराठीतील पहिले सामाजिक विचारनाट्य होते. कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा यातून त्यांनी शिवरायांच्या जीवनातील रोमांचकारी प्रसंग उभे केले. त्यामुळे त्यांना आधुनिक युगातील पहिले शाहीर म्हटले जाते. 'गुलामगिरी' ग्रंथातून त्यांनी भारतातील दोन परंपरांच्या सांस्कृतिक संघर्षाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मानसिक गुलामगिरीतून माणूस मुक्त झाला पाहिजे, हा फुले यांचा विचार होता. मानवमुक्तीचा ध्यास घेणारे फुलेंचे साहित्य होते,'' असे मत डॉ. छाया पोवार यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे फुले शाहू आंबेडकर सप्ताहांतर्गत महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'महात्मा जोतीराव फुले यांचे मानवतावादी साहित्य' यावर व्याख्यान झाले. केंद्राचे संचालक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन अध्यक्षस्थानी होते.

प्रा. महाजन म्हणाले, ''महात्मा फुले यांनी स्त्री-पुरुष समानता, स्वातंत्र्य, शिक्षणाची गरज, शेतकऱ्यांचे प्रश्न या अनुषंगाने जातिभेद नष्ट व्हावा आणि मानवी समाज अंधश्रद्धामधून, कर्मकांडाच्या जाचातून मुक्त व्हावा म्हणून साहित्याची निर्मिती केली. सुखी व समृद्ध मानव जातीचे स्वप्न फुल्यांनी भारतीय समाजाला दिले. धर्मनिरपेक्ष कुटुंब अशी संकल्पना मांडणारे फुले काळाच्या कितीतरी पुढे होते.''डॉ. दीपा श्रावस्ती यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अमोल मिणचेकर यांनी आभार मानले. प्रा. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.